| शिक्षण संचालनालय<br>(माध्यमिक व उच्च माध्यमिक)<br>महाराष्ट्र राज्य<br>मध्यवर्ती इमारत, डॉ.ॲनी बेझंट मार्ग, पुणे-४११००१ | सत्यमेव जयते<br>महाराष्ट्र शासन | Government of Maharashtra<br>DIRECTORATE OF EDUCATION<br>(Secondary & Higher Secondary)<br>Maharashtra State<br>Central Building, Dr.Annie Besant Road, Pune-1 |
|---|---|---|

w'site : education.maharashtra.gov.in Phone : (020) 2612 0361 e-mail : doecentralize11state@gmail.com


**परिपत्रक**

क्र.विद्या-ए-१/११.प्रवेश/२०२२/ 4288
दिनांक-०१/०८/२०२२

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक, (मुंबई, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर)
उपसंचालक (व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण), क्षेत्रिय कार्यालये, सर्व

**विषय :- इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ प्रवेशाचे कार्यवाहीबाबत.**
**द्विलक्षी विषयांसाठी प्रवेश प्रक्रिया तसेच इतर प्रवेश देतांना घ्यावयाच्या दक्षता.**

संदर्भ :-
१.शासन निर्णय क्र.प्रवेश-२०१८/प्रक्र.३३३/एसडी-२ दिनांक.२३/०६/२०२० व शसन पत्र दि.२२/०७/२०२०
२.शासन निर्णय पत्र क्र.प्रवेश-०४२२/प्रक्र.४१/एसडी-२ दिनांक.०९/०६/२०२२
३.राज्यस्तर इ.११वी प्रवेश नियंत्रण समिती बैठक दि.३०/०७/२०२२
४.व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र.०८/४३९ दिनांक.१७/०६/२०२२ व शासकीय तांत्रिक विद्यालयांची पत्रे

राज्यातील मुंबई महानगर क्षेत्र तसेच पुणे, पिंपरी-चिचवड, नाशिक, अमरावती, नागपूर महानगरपालिका या पाच महानगर क्षेत्रांतील इ.११वी चे प्रवेश केंद्रीय ऑनलाईन पद्धतीने करण्यात येत आहेत. प्रवेश प्रक्रिया सुलभ व्हावी यासाठी वेळोवेळी परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात येतात, याद्वारे इ.११वी मध्ये द्विलक्षी विषयांचे प्रवेशाबाबत कार्यपद्धती विशद करण्यात येत आहेत.

ज्याअर्थी, शासन पत्र दि.२२/०७/२०२० नुसार इ.११वी मधील द्विलक्षी विषयांचे प्रवेश उच्च माध्यमिक विद्यालय स्तरावरुन समांतर पद्धतीने गुणवत्तेनुसार करण्यात येतील अशी तरतूद आहे. आणि ज्याअर्थी, द्विलक्षी अभ्यासक्रम हे व्यवसाय शिक्षण विभागाचे नियंत्रणात चालविले जातात आणि त्याचे परवानगी व नियंत्रण इत्यादी कार्यवाही व्यवसाय शिक्षण विभागाचे कार्यकक्षेत आहे. त्याअर्थी, द्विलक्षी विषयांचे प्रवेश व्यवसाय शिक्षण विभागाचे धोरणानुसार होणे आवश्यक आहे सबब इ.११वी मधील द्विलक्षी विषयांसाठी प्रवेशाची कार्यपद्धती पुढीलप्रमाणे असेल.

१. जिल्ह्याचे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांना इ.११वी प्रवेश पोर्टलवर लॉगीन उपलब्ध करण्यात येईल. त्यामध्ये HSVC व Bifocal Courses बाबत विविध अहवाल पाहता येतील तसेच प्रवेशाबाबत आवश्यक कार्यवाही करता येईल.
२. **द्विलक्षी विषयास प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी, प्रथम त्यांना हवे असलेले विषय चालविले जात असलेल्या विद्यालयामध्ये प्रवेश घ्यावा, अशा प्रकारे सर्वसाधारण फेरीतून प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना विद्यालयांतर्गत द्विलक्षी समांतर प्रवेशामध्ये सहभागी होता येईल. संबंधित विषयासाठी ऑनलाईन पसंती नोंदविता येईल.**
३. द्विलक्षी विषय प्रवेशासाठी ऑनलाईन विकल्प नोंदविलेल्या (प्रवेशित) विद्यार्थ्यांचा विषयनिहाय तपशील संबंधित विद्यालय व संबंधित जिल्ह्याचे व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे लॉगीन मध्ये दर्शविली जाईल.
४. सर्वसाधारण फेरीमध्ये पवेश घेतलेले विद्यार्थी त्यापुढील प्रत्येक फेरीवेळी द्विलीक्षी विषय प्रवेशासाठी पात्र ठरतील.
५. सदर ऑनलाईन अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेशासाठी व्यवसाय शिक्षण अधिकारी यांनी Approval देणे आवश्यक असेल. व्यवसाय शिक्षण अधिकारी यांनी प्रमाणित केलेनंतरच फेरीमध्ये (प्रवेशासाठी दिलेल्या वेळेत) विद्यार्थ्यांचे प्रवेश करता येतील.
६. प्रत्येक प्रवेश फेरीमध्ये विद्यार्थ्यांना विकल्प देणे, यादीस मान्यता देणे व विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित करणे यासाठी दिलेल्या निश्चित वेळेमध्येच द्विलक्षी विषय प्रवेशाची कार्यवाही करता येईल. प्रवेश फेरीचे ढोबळ नियोजन असे असेल.

| टप्पे | | CAP कार्यवाही | Bifocal कार्यवाही | Quota प्रवेश |
|---|---|---|---|---|
| APPLY | १ | पसंतीक्रम देणे | पसंती नोंदविणे | पसंती देता येईल |
| | २ | Data Processing | Vocational Approval | List preparation by Jr C |
| ADMISSION | ३ | प्रवेश निश्चत करणे | प्रवेश निश्चत करणे | प्रवेश निश्चत करणे |

७. द्विलक्षी विषय प्रवेशासाठी व्यवसाय शिक्षण विभागाने विहित केलेप्रमाणे आरक्षण लागू असेल. विषय बदलावयाचा असल्यास प्रवेश रद्द करुन पुन्हा पसंती देऊन प्रवेश मिळविता येईल.
८. द्विलक्षी विषय प्रवेश निश्चित केलेनंतर अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश त्याच वेळी विद्यालये पोर्टलवर अपलोड करतील. त्याचा तपशील संबंधित विद्यार्थी व व्यवसाय शिक्षण अधिकारी यांना पाहता येईल.
९. द्विलक्षी विषयांचे प्रवेश नियमित फेरी-२ पासून सुरु करता येतील, सदर प्रवेश प्रत्येक प्रवेश फेरीसोबत करावयाचे अथवा तीन नियमित फेऱ्यांनतर करायचे याचा निर्णय तसेच Approval बाबत निर्णय संबंधित व्यवसाय शिक्षण कार्यालयाचा असेल.

या परिपत्रकासोबत देण्यात आलेल्या अतिरिक्त मार्गदर्शक सूचनांचेही अवलोकन करावे.

MPalkar
**(महेश पालकर)**
**शिक्षण संचालक**
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)

| क्र | बाब | तपशील व कार्यपद्धती |
|---|---|---|
| १ | **Withdrawal of Application-** | १. ज्या विद्यार्थ्यांना इ.११वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतून बाहेर जायचे असेल अथवा इतर अभ्यासक्रमांना प्रवेश घ्यावयाचा असेल (अर्थात ज्यांना आपला भरलेला अर्ज रद्द करावयाचा आहे) त्यांनी अपला अर्ज मागे घेण्यासाठी Withdrawal of Application या सुविधेचा वापर करावा. त्यावर क्लिक केल्यानंतर सदर विद्यार्थ्यांचा अर्ज सिस्टम मधून रद्द (Decactivate) होईल.<br>सर्व सूचना काळजीपूर्वक वाचा व पुढे जा. त्यामुळे इतर विद्यार्थ्यांना प्रवेशाची संधी वाढतील.<br>२. जर एखाद्या विद्यार्थ्याने चुकीने Withdraw Application बटन क्लिक केले असेल तर असे अर्ज पुन्हा UnWithdraw करण्याची सुविधा शिक्षण उपसंचालक लॉगीन मध्ये देण्यात आलेली आहे. |
| २ | **Unblock Seat Number** | एखाद्या विद्यार्थ्यास Student Registration करतांना असे निदर्शनास आले की आपला इ.१०वी परीक्षेचा आसन क्रमांक यापूर्वीच कोणीतरी वापरलेला आहे त्यामुळे नोंदणी होत नसेल तर, अशा बाबतीत Unblock Seat Number ही सुविधा मार्गदर्शन केंद व शिउसं लॉगीन मध्ये देण्यात आलेली आहे. त्याचा वापर करतांना तो नंबर यापूर्वी कोणी वापरला यांची संपूर्ण खात्री करुनच Unblock करावा. Seat No. Unblock केल्यानंतर त्या नंबरवर भरलेला मूळ अर्ज रद्द होईल. |
| ३ | CAP Allotment नंतर **Proceed for Admission** | १. प्रवेश फेरीमध्ये Allotment नंतर प्रवेशासाठी मिळालेल्या उच्च माध्यमिक विद्यालयात प्रवेश घ्यावयाचा असल्यास Student Login मध्ये विद्यार्थ्याने Proceed for Admission क्लिक करणे आवश्यक आहे. त्यानंतर संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयाशी संपर्क साधून आपला प्रवेश घ्यावा.<br>२. केवळ Proceed केले म्हणजे प्रवेश झाला असे होत नाही हे लक्षात घ्यावे. चुकीने Proceed for Admission केले असल्यास Undo Proceed करण्याची सुविधा विद्यार्थी लॉगीन मध्ये देण्यात आलेली आहे. |
| ४ | CAP पसंतीक्रम व त्यामध्ये बदल करणे, विशेष फेरीपूर्वी Consent Mandatory | विद्यार्थ्यांना CAP जागांवरील प्रवेशासाठी भाग-२ अर्जामध्ये किमान-१ व कमाल-१० कनिष्ठ महाविद्यालयांच्या नावांना पसंती देता येते.<br>१. सदर पसंती नोंदविलेनंतर तो भाग-२ अर्ज नियमित फेऱ्या १, २, ३ मध्ये बदल नसल्यास कायम राहील. तथापि विद्यार्थ्यांना त्यामध्ये प्रत्येक फेरीपूर्वी बदल करता येईल.<br>२. विशेष फेरीपूर्वी मात्र ऑनलाईन संमती देऊन पसंतीक्रम कायम करणे आवश्यक राहील. अन्यथा असे अर्ज विशेष फेरीमध्ये विचारात घेतले जाणार नाहीत.<br>भाग-२ CAP पसंती पुन्हा भरुन लॉक करणे (Consent) बंधनकारक असेल. |
| ५ | प्रवेशावेळी विद्यालयांनी तपासावयाच्या बाबी. | १. इ.११वी मध्ये प्रवेश देण्यासाठी निकषानुसार सदर विद्यार्थी पात्र आहे काय याची खात्री करणे.<br>२. इ.१०वी अथवा समकक्ष परीक्षेचे गुणपत्रक तपासून तेच गुण अर्जात नमूद असलेचे तपासणे, तसेच यापूर्वीची शाळा सोडल्याचा मूळ दाखला तपासून घेणे.<br>३. विद्यार्थ्यास प्रवेश कोणत्या प्रवर्गातून झालेला आहे त्यानुसार संबंधित कागदपत्रे/ पुरावे (मार्गदर्शन केंद्रांने तपासलेले) पुनश्च तपासून खात्री झालेनंतरच संबंधितांचा प्रवेश निश्चित करावा.<br>४. अलॉटमेंट नंतर उर्वरित कागदपत्रे अपलोड करण्याची संधी विद्यार्थी लॉगीन मध्ये देण्यात आलेली आहे. त्यानुसार मूळ प्रमाणपत्रे तपासून विद्यालयांना ती Verify करता येतील. |
| ६ | प्रवेश देणाऱ्या उच्च माध्यमिक विद्यालयांसाठी सूचना- | १. प्रवेशासाठी उच्च माध्यमिक विद्यालयांनी **Online Admission** तसेच **Digital Payment** ची सुविधा उपलब्ध करुन घेणेची कार्यवाही करावी. कोणत्याही कारणासाठी गर्दी करणे टाळून कोवीड सुरक्षित वर्तन कार्यपद्धतीनुसार प्रवेश निश्चित करता येतील अशा सुविधा विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.<br>२. विद्यार्थ्यांनी आपले प्रवेश विद्यालयात कशाप्रकारे निश्चित करावेत, याबाबतची सविस्तर माहिती, संबंधित उच्च माध्यमिक विद्यालयांनी स्पष्ट व थोडक्यात इ.११वी प्रवेश प्रक्रियेच्या पोर्टलवर **Process for Admission** अंतर्गत नोंदवावी. त्याप्रमाणे कार्यवाही विद्यार्थी अचूक करु शकतील.<br>३. प्रवेशासाठी आवश्यकतेप्रमाणे कागदपत्रांची काळजीपूर्वक तपासणी करावी परंतु अन्य अनावश्यक माहिती जसे पुन्हा वेगळा अर्ज भरणे, अनावश्यक कागदपत्रांचा आग्रह धरणे टाळावे. विद्यार्थ्याने अपलोड केलेली कागदपत्रे मूळ कागदपत्रे त्यांसोबत ताडून पाहावीत व प्रवेश निश्चित करावेत आणि प्रवेशाची कार्यपद्धती व कालावधी विद्यार्थ्यांना व्यवस्थित समजावून सांगावी.<br>४. चुकीच्या अथवा पात्र नसलेल्या विद्यार्थ्याचा प्रवेश होणार नाही याबरोबरच कोणा योग्य व पात्र विद्यार्थ्यास प्रवेश नाकाराला (Reject) जाणार नाही याची दक्षता घ्यावी. प्रवेश नाकारताना त्याबाबत संपूर्ण खात्री करुन स्पष्ट कारणे नमूद करावीत.<br>५. प्रवेश अर्जाची तपासणी करतांना पोर्टल तसेच माहितीपुस्तिकेत दिलेल्या सूचनांचा काळजीपूर्वक अभ्यास करावा. संपूर्ण कार्यवाही अचूक व दिलेल्या वेळेत पूर्ण करावी.<br>६. विद्यार्थ्याचा प्रवेश सुलभ होईल यासाठी शाळा, मार्गदर्शन केंद्र, उच्च माध्यमिक विद्यालये, पालक यांनी समन्वय राखून विद्यार्थ्यांस प्रवेशासाठी मदत करावी. प्रवेशाचे नियम सर्वांनी समजावून घ्यावी. |
| * | ATKT | इ.१०वी पुरवणी परीक्षेच्या निकालानंतर ATKT विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी अर्ज करता येतील. |

| | | |
|---|---|---|
| ७ | विभागीय शिक्षण उपसंचालक यांचेसाठी सूचना- | इ.१०वी पुरवणी परीक्षेच्या निकालानंतर ATKT विद्यार्थ्यांचा विचार करण्यात येईल.<br>CAP प्रवेशामध्ये तीन नियमित फेऱ्या व एक विशेष फेरीचे आयोजन केले जाईल, विशेष फेरीनंतर तत्कालिन गरजेनुसार प्रवेश फेरी आयोजित करणेबाबत निर्णय केला जाईल.<br>७५ टक्के प्रवेश झाल्यानंतर विद्यालयांना अध्यापनास सुरुवांत करता येईल.<br><br>१. विद्यार्थ्यांचे अर्ज प्रमाणित करणारे केंद्रांनी अर्ज अचूक प्रमाणित करावेत, यासाठी संबंधितांना मार्गदर्शन करावे. त्यामुळे प्रवेश नाकारण्याची वेळ येणार नाही.<br>२. आपले स्तरावर प्राप्त होणारे Grievnce इ-मेल तपासून त्यांना लगेच उत्तर दिले जाईल, कोणत्या कामासाठी कोणास फोन करावा इत्यादी तपशील प्रसिद्ध करावा. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसण वेळेत केले जाईल.<br>३. आपले स्तरावरील केंद्रीय प्रवेश समितीची पुनर्रचना करणेत यावी, नवीन सदस्यांना संधी द्यावी. तसेच विभागीय स्तरावर प्रवेश प्रक्रियेचे कामकाज करणारे कर्मचारी कामकाजावर नियंत्रण ठेवावे, तेच-ते कर्मचारी ठेवू नयेत. प्रवेश प्रकियेबाबत तक्रारी उद्भवणार नाहीत याची दक्षता घ्यावी.<br>४. आलेल्या अडचणी, प्रश्न एकत्र करुन त्याबाबत क्षेत्रीय समिती सोबत चर्चा करावी आणि सदर प्रश्नोत्तरे (वारंवार विचारले जाणारे प्रश्न सदराखाली) अपलोड करणेसाठी राज्यस्तर प्रवेश नियंत्रण कक्षास वेळोवेळी कळवावेत. |
| ८ | व्यवसाय शिक्षण कार्यालयांसाठी | १. द्विलक्षी विषयांचे प्रवेश ऑनलाईन अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांमधून द्यावयाचे आहेत. सदर पवेश आपले नियंत्रणात होणार आहेत त्यासाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेशास वेळेत Approval दिले जाईल यासाठी स्वतंत्र अधिकारी यांची नियुक्ती करावी.<br>२. संपूर्ण यादीस अथवा विषय निहाय यादीस अथवा त्यामधील निवड केलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेशास Approval देण्याची सुविधा आपले लॉगीनमध्ये देण्यात आलेली आहे. सदर Approval साठीची कार्यपद्धती आपले स्तरावरुन संबंधित विद्यालयांना आपलेस्तरावरुन कळवावी.<br>३व्यवसाय शिक्षण बाबत अभ्यासक्रम चालविणारे विद्यालयांचा तपशील व प्रवशाचे Reports आपले लॉगीन मध्ये देण्यात आलेले आहेत. |

सदर परिपत्रक इ.११वी केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया २०२२-२३ साठी जारी करणेत येत आहे.

त्याबाबत संबंधित घटकांना अवगत करावे.

MPalkar

**(महेश पालकर)**
**शिक्षण संचालक**
(माध्यमिक व उच्च माध्यमिक)